कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयः, (रामटेक) महाराष्ट्रम्

रामटेक कार्यालय–प्रशासकीय भवन, मौदारोड, रामटेक– 441106, जि.नागपूर

नागपूर कार्यालय–शैक्षणिक परिसर, पाचवा माळा, ना.सु.प्र. संकुल, मोरभवनजवळ, नागपूर–12.

Ramtek: Ph. 07114-256476, Fax. 255549 Nagpur: Ph. 0712-2248094

पत्र क्र. ककासंवि/व्हीसीओ/ज.सं./2019/35 **दि.: 29/03/2019**

पं. वसंत गाडगीळ, डॉ. लीना रस्तोगी व प्रो. वसंतकुमार भट्ट यांना देखण्या सोहळयात ''महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार'' प्रदान

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे पं. रामनारायण शर्मा वैद्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पं. रामनारायण शर्मा आयुर्वेद संशोधन प्रतिष्ठान, स्थानिक जिल्हा प्रशासन आणि महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ''**महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार समारोह**'' आज **शुक्रवार, दि. 29 मार्च 2019 रोजी सायंटिफिक सभागृह, लक्ष्मीनगर येथे संपन्न झाला.**

कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या आध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या पुरस्कार सोहळयाला **प्रमुख अतिथी** या नात्याने विश्वेश्वरय्या प्रौद्योगिकी राष्ट्रीय संस्थान, नागपूरचे अध्यक्ष, प्रख्यात उद्योजक आणि संस्कृतप्रेमी **श्री. विश्रामजी जामदार** उपस्थित होते. बैद्यनाथ प्रतिष्ठानचे व्यवस्थापक **श्री. रमेश शर्मा, पुरस्कारप्राप्त विद्वान पं. वसंत गाडगीळ, डॉ. लीना रस्तोगी व प्रो. वसंतकुमार भट्ट** यांच्यासह संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता **प्रो. नंदा पुरी,** कुलसचिव **डॉ. रामचंद्र जोशी** व्यासपीठावर विशेषत्वाने उपस्थित होते.

सरस्वती स्तवन आणि विश्वविद्यालय गीतानंतर संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या **अधिष्ठाता प्रो. नंदा पुरी यांनी प्रास्ताविक** केले. प्रास्ताविकात महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्काराची पूर्वपीठिका सांगितली. ज्या विद्वज्जनांनी संस्कृत भाषेच्या प्रचार, प्रसार, विकास तसेच संशोधनासाठी आयुष्यभर सेवा केली त्यांचा यथोचित गौरव व्हावा हा प्रस्तुत पुरस्कार प्रदान करण्यामागचा उद्देश आहे. समाजात संस्कृत भाषेला गौरवयुक्त स्थान मिळवून देण्यात ज्यांनी अमूल्य योगदान प्रदान केले अशा महान विभूतींना महाकवी कालिदास संस्कृत–व्रती पुरस्कार विश्वविद्यालयाकडून दिला जातो, हे स्पष्ट केले.

प्रमुख अतिथी श्री. विश्रामजी जामदार आणि बैद्यनाथचे व्यवस्थापक श्री. रमेश शर्मा यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, भेटवस्तू देवून मा. कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

पं वसंत गाडगीळ, डॉ. लीना रस्तोगी व प्रो. वसंतकुमार भट्ट यांना प्रदान करण्यात आलेल्या सन्मानपत्रांचे वाचन अनुक्रमे डॉ. पराग जोशी, डॉ. रेणुका बोकारे आणि डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी केले.

सन 2017 करिता प्रख्यात संस्कृत पंडित व पुण्याहून प्रसिद्ध होणा–या 'शारदा' संस्कृत पाक्षिकाचे संपादक पं. वसंत गाडगीळ, 2018 करिता नागपुरातील प्रख्यात संस्कृत विदुषी आणि संस्कृत भाषा प्रचारिणीच्या अध्यक्षा डॉ. लीना रस्तोगी तसेच संस्कृत विद्वान प्रो. वसंतकुमार भट्ट, निवृत्त संस्कृत विभागाध्यक्ष, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद यांना हा पुरस्कार देवेश आर्वीकर आणि अद्वैत आर्वीकर यांनी केलेल्या वैदिक मंत्रोच्चारणांच्या उद्घोषात प्रमुख अतिथी श्री. विश्रामजी जामदार, प्रो. श्रीनिवास वरखेडी तसेच अन्य मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, चंदनहार, पुष्पगुच्छ, रोख धनराशी, भेटवस्तू यांचा पुरस्कारामध्ये समावेश होता.

पुरस्कारप्राप्त विद्वानांचे संक्षिप्त मनोगत

पं. वसंत गाडगीळ यांनी संस्कृत राष्ट्रभाषा व्हायला पाहिजे आणि त्यासाठी मी वचनबद्ध व प्रयत्नरत आहे असे सांगितले. प्रो. वसंतकुमार भट्ट यांनी स्वगुरुंबद्दल आदर व्यक्त करून माझ्या अल्पशा संस्कृत सेवेचा कालिदासाच्या नावाने मिळालेला पुरस्कार मोठा सन्मान असल्याचे विनम्रतापूर्वक सांगितले. डॉ. लीना रस्तोगी यांनी माझ्या अणुएवढया कार्याचा आणि गुणांचा हा पर्वताएवढा उत्तुंग सन्मान असून मी अजूनही संस्कृत साधिका असल्याचे नमूद केले. तीनही विद्वानांनी हा पुरस्कार प्रदान केल्याबद्दल विश्वविद्यालयाचे आभार मानले.

पुरस्कारप्राप्त विद्वानांचा संक्षिप्त परिचय –

पं. वसंत गाडगीळ हे महाराष्ट्रातील प्रख्यात वेदविद्या पंडित आहेत. महाराष्ट्रातील सर्वात जुने आणि आजही उत्तमरीत्या सुरू असलेले संस्कृत भाषेतून प्रकाशित होणा–या ''शारदा'' पाक्षिकाचे ते संपादक आहेत. यावर्षी हे पाक्षिक हीरक महोत्सव साजरा करीत आहे. याशिवाय देश–विदेशात निरंतर व्याख्यानांसाठी त्यांना निमंत्रित केले जाते. संस्कृत पत्रकारितेचा व वेदविद्येचा वसा निष्ठेने चालविणा–या पंडितांमध्ये श्री. गाडगीळ हे अग्रेसर आहेत.

प्रो. वसंतकुमार भट्ट हे साहित्य व्याकरण आणि हस्तलिखिशास्त्राचे विद्वान आचार्य आहेत. गुजरात विद्यापीठात भाषाविभागाचे संचालकपद तसेच संस्कृत विभागाध्यक्ष पद त्यांनी भूषविले आहे. अभिज्ञानशाकुन्तल या कालिदासविरचित नाटकाची पाठचिकित्सा आवृत्तीचे महद्कार्य भट्ट यांनी केले आहे. राष्ट्रपती सन्मानासह अनेक मानसन्मान त्यांना प्राप्त झाले असून त्यांची 42 पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

डॉ. लीना रस्तोगी या उमरेड येथील नूतन आदर्श कला महाविद्यालयातून संस्कृत विभाग प्रमुख म्हणून निवृत्त झाल्या आहेत. सांप्रत त्या संस्कृत भाषा प्रचारिणी सभेच्या अध्यक्षा आहेत. संस्कृत भवितव्यम् या नागपुरातून प्रकाशित होणा–या साप्ताहिकाच्या पूर्वसंपादिका आहेत. संस्कृत विदुषी आणि संस्कृत कवयित्री म्हणून त्या महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभरात प्रख्यात आहेत. महाराष्ट्र शासनाचा महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्काराने त्यांचा यापूर्वी गौरव झाला आहे. त्यांचे 17 ग्रंथ प्रकाशित झाले असून 10 प्रकाशनाधीन आहेत. तसेच अनेक संस्कृत एकांकिकांची रचना त्यांनी केली आहे.

प्रमुख अतिथी श्री विश्रामजी जामदार यांनी आपल्या भाषणात संस्कृतचे महत्त्व प्रतिपादन केले. ''संगणकासाठी संस्कृत अचूक भाषा आहे हे सर्वविदित आहे; परंतु संगणकतज्ज्ञाला संस्कृत भाषेचे ज्ञान नसते तर संस्कृत तज्ज्ञाला संगणकाचे ज्ञान नसते ही तफावत दूर करण्याचा प्रयत्न व्हीएनआयटी ने संस्कृत विषयक अभ्यासक्रम परिचालित करून केला आहे. संगणक, अभियांत्रिकी या शाखा आणि संस्कृत यांचे आंतरविद्याशाखीय अध्ययन झाले पाहिजे. विशेषतः अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये संस्कृत हा विषय सुरू झाला पाहिजे असे स्पष्ट मत व्यक्त करून संस्कृत शिकलेली व्यक्ती ही संस्कारी आणि संस्कृतीचे पालन करणारी असते असे आपले निरीक्षण आहे. संस्कृत क्षेत्रातील या थोर विद्वानांचा सत्कार करण्याचे सौभाग्य मला विश्वविद्यालयाने दिले यासाठी मी सन्माननीय कुलगुरूंचा आभारी आहे. संस्कृत क्षेत्रातील या समर्पित व्यक्तिमत्त्वांच्या सहवासाने मी पुनीत झालो असे भावपूर्ण उद्‌गारही श्री जामदार यांनी व्यक्त केले.''

बैद्यनाथ प्रतिष्ठानचे व्यवस्थापक श्री. रमेश शर्मा यांनी आयुर्वेद आणि संस्कृत यांचा संबंध अधोरेखांकित करून आपले संपूर्ण सहकार्य विश्वविद्यालयाला राहिल असे नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांनी पं. गाडगीळ, डॉ. रस्तोगी आणि प्रो. भट्ट हे संस्कृत भाषेसाठी आपले जीवन समर्पित केलेली व्यक्तिमत्त्वे आहेत, त्यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी ठेवला पाहिजे. अशा तपःपूत विद्वानांचा सत्कार करणे विश्वविद्यालयाला भूषणावह आहे. या पुरस्कारकार्यक्रमासाठी सहकार्य करणा–या सर्वांचे तसेच संस्कृत नाट्यस्पर्धेत सहभागी सर्व संस्था, नाटकाची चमू आणि विद्यार्थी व रसिक प्रेक्षकांचे आभारही मा. कुलगुरू महोदयांनी मानले.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे आयोजित द्विदिवसीय नाट्यस्पर्धेचे पारितोषिक वितरणही याप्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

पुरस्कार समारोहाचे **संचालन डॉ. रेणुका बोकारे आणि डॉ. रेणुका करंदीकर यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी** यांनी मानले. एकात्मता मंत्राने कार्यक्रमाची समाप्ती झाली. या समारोहाला नागपुरातील ज्येष्ठ व श्रेष्ठ संस्कृत विद्वान, संस्कृतानुरागी,

विश्वविद्यालयाचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, विविध महाविद्यालयांचे संस्कृत विभागप्रमुख, गणमान्य नागरिक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. **या कार्यक्रमासाठी प्रो. कविता होले, डॉ. पराग जोशी, सौ. माधुरी येवले, श्री. मंगेश आटे, श्री. उमेश पाटील यांचे सहकार्य लाभले.**

स्वा/–

जनसंपर्क अधिकारी